महात्मा फ़ुले कृषि विद्यापीठ, राहूरी
**राजर्षी छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर**
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६००४ (महाराष्ट्र)
फ़ोनं क्रं. : ०२३१-२६०५१५३, २६०५८५१, २६०५८५२ फ़ॅक्स क्रं. : २६०६२५६

# ओल्या गवताचा जाहिर लिलाव

राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय कोल्हापूर अंतर्गत उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावरील ओल्या गवताचा जाहिर लिलाव दि. २४/०७/२०२४ रोजी सकाळी १०:३० वा. व शेंडा पार्क प्रक्षेत्रावरील ओल्या गवताचा जाहिर लिलाव दुपारी २:३० वा. करणेत येणार आहे. तरी लिलावाकरीता शेतक-यानी सहभाग घ्यावा.

**लिलावच्या अटी व शर्ती:-**

१. लिलावाची रक्कम ताबडतोब त्याच दिवशी लिलावाच्या ठिकाणी किंवा दुसरे दिवशी ३ वाजेपर्यंत कार्यालयात भरणेची आहे.
२. रक्कम भरलेली पावती पाहूनच गवत कापणेस परवानगी देण्यात येईल.
३. ज्या लिलावाची प्रथम बोली मंजुर झाली आहे त्याने दिलेल्या मुदतीत पैसे न भरल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याच्या खालोखाल लिलावाची बोली बोललेल्या लिलावदारास लिलाव दिला जाईल.
४. लिलाव क्षेत्रातील गवत लिलाव झालेल्या तारखेपासून पुढे तीन महिने पर्यंत कापता येईल व वेळोवेळी गवत कापून प्लॉट रिकामे रण्यात यावेत.
५. ज्याचे नावे लिलाव मंजूर झालेला आहे त्याने लिलाव केलेल्या मर्यादित क्षेत्रातील गवत कापायचे आहे आणि पिकास नुकसान करायचे नाही. हे जाणीवपुर्वक लक्षात छेवावे तसे न झाल्यास व पिकाची इतर नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिलावदारावर राहिल व त्याची त्यांना नुकसान भपाई करावी लागेल.
६. लिलाव झालेल्या क्षेत्रातील फक्त गवत कापायचे आहे. त्या व्यतिरीक्त जनावरे चारावयाची नाहित अथवा झाडे वेनुन / कापुन नेण्याची परवानगी नाही.
७. लिलाव घेतलेल्या प्रक्षेत्रावरील गवत राखण्याची सर्वस्वी जबाबदारी लिलावदाराची राहिल.
८. सदरील जागेत कोणत्याही प्रकारचे गवताचे ढीग अथवा गंज घालण्यात येवु नये.
९. अकस्मात लागलेल्या आगीमूळे होणारी नुकसान भरपाई कोणत्याही अटी वर मिळणार नाही या मूळे गवत राखण्याची सर्वस्वी जाबाबदारी लिलाव धारकाची असेल.
१०. गवत कापताना वृक्षारोपण केलेल्या झाडाना कोणत्याही प्रकारची इजा पोहोचवू नये तसे निरीक्षणास आल्यास झाडे लावण्यावर आलेल्या खर्चाच्या दूप्पट रक्कम वसूल करण्यात येईल.

११. लिलावाची बोली बोलणाऱ्यास रू. ५००/- अनामत रक्कम लिलावच्या वेळी भरावी लागेल त्याशिवाय लिलावाची बोली बोलण्यास परवानगी नाही.

१२. लिलावदाराने बैलगाडीने गवताची वाहतुक करावयाची झाल्यास प्रक्षेत्राच्या डांबरी सडकेवर फक्त टायर गाडीचा वापर करावा चाके लोखंडी धावेची असल्यास ती बैलगाडी डांबरी सडकेवरून फिरवण्यास परवानगी नाही.

१३. प्रक्षेत्रावरील रस्ते बांध दगडगोटे या बाबतच्या अडचणी आपल्या स्तरावर सोडवाव्यात.

१४. लिलाव मंजुर करणेचे अगर रद्द करणेचे सर्व अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांनी राखुन ठेवलेले असून त्याची कारणे दिली जाणार नाही.

१५. लिलाव धारकाने विहीत वेळेत सर्व गवत कापून घ्यावे तसेच गवत बाकी राहिल्यास व आग लागून नुकसान झाल्यास किंवा राहिलेल्या गवतामूळे इतर प्रकारे नुकसान झाल्यास संबंधीत लिलाव धारकाकडून वसुली करण्यात येईल.

अध्यक्ष

गवत लिलाव समिती तथा सहयोगी अधिष्ठाता

राजर्षी छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय,कोल्हापूर